# जाहिर नोटीस

## संदेशनगर प्लॉट क्र. १ ते १२

याद्वारे वसाहतींमधील सर्व झोपडीधारकांना सुचित करण्यात येते की, मौजे - कुर्ला, भाग-१ ता. कुर्ला येथील न.भु.क्र.१ या केंद्र शासनाचे मिळकतीवरील विमानपतन प्राधिकरणाच्या जागेवरील संदेशनगर-बैल बाजार, कुर्ला येथील झोपडीधारकांची पात्रता निश्चित करणेची असल्यामुळे सदर वसाहतीमध्ये समाविष्ट असलेल्या झोपडीधारकांची पात्रता निश्चित करून उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) व सक्षम प्राधिकारी, कुर्ला यांच्या कार्यालयाकडून प्रारूप परिशिष्ट-२ ची प्रत वसाहतीमधील सर्व लोकांना दिसेल अशा दर्शनी भागात आणि स्थानिक कमिटीच्या कार्यालयीन नोटीस बोर्डावर आज दि. ४ फेब्रुवारी, २०१६ रोजी सदर जाहिर नोटीस प्रसिध्द करण्यात येत आहे.

तसेच यापूर्वी संदेशनगर येथील मिठी नदी अंतर्गत टप्पा १ व २ मध्ये बाधित झोपडीधारकांचे पुनर्वसन मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचेमार्फत करण्यात आलेले असून त्याना सदनिकाचे वाटप देखील करण्यात आलेले आहे. जर विमानपतन प्राधिकरणाचे सदर सर्व्हेक्षणात मिठी नदी अंतर्गत टप्पा १ व २ मधील बाधित व्यक्ती जर चुकीने पात्र झाले असतील तर अशा झोपडीधारकांची संदेशनगर येथील या जागेची पात्रता रद्द ठरविण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सर्व संबंधीत झापेडीधारकांनी प्रसिध्द करण्यात आलेल्या प्रारूप परिशिष्ट-२ मध्ये त्यांच्या नावाची खात्री करावी आणि पात्र/अनिर्णिततें बाबत त्यांच्या काही हरकती / आक्षेप असल्यास त्या लेखी स्वरूपात प्रारूप परिशिष्ट-२ ची यादी प्रसिध्द केल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत पुराव्यासह **उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) तथा सक्षम प्राधिकारी कुर्ला यांचे टोपीवाला कॉलेज, मुलुंड (प), मुंबई-८० स्थित कार्यालयात सादर करावेत.** मुदतीनंतर प्राप्त झालेले आक्षेप/हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत याची विशेष नोंद घ्यावी.

स्थळ : मुलुंड.
दिनांक : ०४/०२/२०१६

उपजिल्हाधिकारी (अति/निष्का)
तथा सक्षम प्राधिकारी,कुर्ला

टिप :

१) सदर प्रारूप परिशिष्ट-२ अधिक माहितीकरीता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे संकेत स्थळ क्र. https://mmrda.maharashtra.gov.in/airport वर उपलब्ध आहे.

२) झोपडीधारकांचे दावे/हरकती प्रारूप परिशिष्ट-२ प्रसिध्द झाल्याचे तारखेपासून ३० दिवसांचे आंत मुलुंड व विद्याविहार (प) येथील आय.टी.आय इमारत पहिला मजला येथे कार्यालयीन वेळेत स्विकारणेत येतील.